# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः युकयो-१६१३/प्र.क्र.६६/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख: १९ डिसेंबर, २०१३

**वाचा :-**

शासन निर्णय क्रमांकः क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/क्रीयुसे-१, दि.१४ जून, २०१२

**प्रस्तावना :-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतास तरूणांचा देश म्हणून ओळख प्राप्त होते आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या तरुणांची आहे. युवांना जागतिकीकरणाच्या गतिशी संतुलितपणे जोडण्यासाठी, आपल्या देशातील युवांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, भौगोलिक वैविध्यतेचे ज्ञान, उत्पन्नाची साधने, नागरिकांची कर्तव्ये व जबाबदा-या याकडे विशेष लक्ष देणे अत्यावश्यक आहे. श्रमशक्तीचे योग्य व्यवस्थापन केल्यास राज्याच्या विकास प्रक्रियेत युवांचा सहभाग वृध्दिंगत होऊ शकतो. मागील साठ वर्षांच्या कालखंडात युवकांसाठी विविध योजना राबविण्यात आल्या असल्या तरी त्यामध्ये सुसूत्रता व दर्जा वाढ करणे गरजेचे आहे. लोकसंख्येने मोठया असलेल्या घटकाच्या विविध गरजांकडे लक्ष न पुरविल्यास त्यांच्यामध्ये प्रचलित व्यवस्थेविषयी वैफल्य येऊन त्यांच्यातील क्रयशक्तीचा वापर होऊ शकणार नाही. महाराष्ट्र राज्य युवा धोरण-२०१२ मध्ये याबाबत सर्वकष विचार करण्यात येऊन युवकांना व युवा क्षेत्रात काम करणा-या संस्थाना युवक कल्याण विषयक उपक्रमांना सहाय्य करण्यासाठी राज्य युवा विकास निधीची स्थापना करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने राज्य युवा विकास निधीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राज्यातील युवांना सक्षम करण्यासाठी विविध युवक कल्याण विषयक उपक्रमांना सहाय्य करण्याकरीता तसेच राज्यात युवा विकासाचे उपक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी तसेच राज्यातील उदयोन्मुख युवांना उज्वल भविष्याच्या संधी वृध्दिगंत करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन व आर्थिक सहाय्य देण्याची गरज लक्षात घेऊन -राज्य युवा विकास निधी॰ स्थापना करण्यास खालील अटी व शर्तीस अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**आर्थिक मदत मिळण्यासाठी अनुज्ञेय बाबी :-**

i. राज्यातील युवांना / युवा संस्थांना युवा कल्याणकारी उपक्रम राबविण्याकरीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

ii. राज्यातील युवांना / युवा संस्थांना युवक कल्याण क्षेत्रात करावयाच्या संशोधनाकरीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

iii. युवक कल्याण क्षेत्रात भरीव स्वरूपाचे योगदान दिलेल्या प्रतिभासंपन्न युवांना या क्षेत्रात अधिक कार्य करण्याकरीता शिष्यवृत्ती / फेलोशिप देणे.

iv. युवांना सक्षम करण्याकरीता विशेष उपक्रम राबविणाऱ्या संस्था / शैक्षणिक संस्था / शासकीय-निमशासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे

v. युवा विकासाशी संबंधित साहित्य निर्मितीकरीता राज्यातील युवांना / युवा संस्थांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे

vi. राज्यातील युवांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना शोधण्याकरीता सर्वेक्षण करण्यास आर्थिक सहाय्य करणे.

vii. नोकरीमध्ये कार्यरत असतांना युवांना नोकरीत किंवा व्यवसायात कुशलता येण्यासाठी लागणारे अद्यावत ज्ञानाची माहिती करुन घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देणे.

viii. शासन/विविध स्वयंसेवी संस्था यांचेमार्फत युवांसाठी आयोजित होणाऱ्या चर्चासत्रे, कार्यशाळा, शिबीरे, उद्बोधन वर्गास अर्थसहाय्य करणे.

ix. याशिवाय समितीस रास्त वाटणाऱ्या युवा विकासाच्या योजनेबाबत निर्णय घेऊन अर्थसहाय्य देणे.

**<u>संस्था व व्यक्तीस आर्थिक मदत मिळण्यासाठी पात्रतेचे निकष :-</u>**

**i.** राज्यातील धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे मुंबई संस्था नोंदणी अधिनियम १९५० किंवा विश्वस्त संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणीकृत संस्था या आर्थिक सहाय्याकरीता पात्र राहतील.मात्र सदरची संस्था किमान ५ वर्षे युवा कल्याण क्षेत्रात कार्यरत असणे आवश्यक आहे.

**ii.** महाराष्ट्रातील अधिवास प्रमाणपत्र धारण करणारे १५ ते ३५ वयोगटातील युवा या योजनेंतर्गत आर्थिक सहाय्याकरीता पात्र राहतील.

**<u>आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी कार्यपध्दती :-</u>**

i. राज्यातील प्रत्येक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून सदर योजनेची विस्तृत प्रसिद्धी केली जाईल.

ii. प्रत्येक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय स्तरावर प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून योग्य असलेले अर्ज आर्थिक सहाय्यासाठी क्रीडा संचालनालयास सादर करण्यात येतील.

iii. क्रीडा संचालनालय या अर्जांची पुन्हा छाननी करून अनुदानाकरीता पात्र युवा / संस्थांचे अर्ज राज्य युवा विकास निधी संनियंत्रण समितीकडे सादर करेल.

iv. राज्य युवा विकास निधी संनियंत्रण समिती प्राप्त अर्जांचा सर्वंकष विचार करून आवश्यक ते आर्थिक सहाय्य मंजूर करेल.

**निधी उभारणीचे स्त्रोत :-**

i. सुरुवातीस राज्य शासनाचा रु.२५.०० लाख प्रारंभिक वाटा राहील. त्यानंतर प्रतिवर्षी योग्य ती तरतूद शासनामार्फत करण्यात येईल.
ii. विविध औद्योगिक प्रतिष्ठाने वा वाणिज्य प्रतिष्ठानातर्फे देण्यात येणाऱ्या देणग्या औद्योगिक/वाणिज्यिक प्रतिष्ठानतर्फे स्वेच्छेने देण्यात येणाऱ्या देणग्या.
iii. विविध खाजगी उद्योग समूहांकडून कार्पोरेट सोशल रिस्पॉनसिबिलिटी अंतर्गत प्राप्त होणारा निधी.
iv. युवा विषयक कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम इ. उपक्रमांचे आयोजनाकरीता प्रायोजकांचे माध्यमातून जमा होणारा निधी.

**निधीचे संनियंत्रण समिती :-**

| | |
|---|---|
| मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण | अध्यक्ष |
| मा.राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण | उपाध्यक्ष |
| अतिरिक्त मुख्य सचिव, क्रीडा व युवक कल्याण | सदस्य |
| नेहरु युवा केंद्र, झोनल डायरेक्टर | सदस्य |
| राष्ट्रीय युवा पुरस्कार्थी (२ प्रतिनिधी) | सदस्य |
| आयुक्त /संचालक, क्रीडा व युवक सेवा | सदस्य-सचिव |

**प्रशासकीय मान्यता व मंजूरीचे अधिकार :-**

i. उपरोक्त प्रयोजनार्थ प्रत्येक प्रकरणात रु. २५.०० लक्ष पर्यंतचा निधी मंजूरीचे अधिकार हे राज्य युवा विकास संनियंत्रण समितीस राहतील.
ii. निधी मंजूर करत असताना पात्र लाभार्थी व त्यांना दयावयाचे अनुदान यासंबंधात काटेकोरपणे योग्य लाभार्थीलाच अनुदान मिळेल याची दक्षता समितीने घ्यावी.
iii. समितीने मंजूर केलेला निधी हा आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे मार्फत संबंधीत युवांना/युवा संस्थांना वितरीत करण्यात येईल.
iv. आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**निधीचे व्यवस्थापन :-**

i. राज्य युवा निधीचे राष्ट्रीयीकृत बॅकेत बचत खाते उघडण्यात येईल.
ii. हे बचत खाते राज्य युवा विकास निधी संनियंत्रण समितीचे सदस्य सचिव आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे स्वाक्षरीने संचालित करण्यात यावे.

iii. निधीत जमा होणारी रक्कम मुदत ठेवीमध्ये गुंतविण्याचे अधिकार समितीस राहतील.

iv. संबंधित निधीचे हिशेब सनदी लेखापाल यांच्याकडून दरवर्षी तपासून घ्यावे.

v. या निधीचे लेखा परिक्षण वेळोवेळी महालेखापाल यांच्याकडून करुन घेण्यात यावे. त्यासाठी निधीचे लेखे ठेवण्याबाबत लेखापध्दती महालेखापाल यांच्याकडून विहित करुन घेण्यात येईल.

नियमात अंशत: /पूर्णत: बदल करण्याचे अथवा नियम शिथिल करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील व पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

या योजनेसाठी पुढीलप्रमाणे लेखाशिर्षमधून तरतूद करण्यात येईल. मागणी क्रमांक ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा, (००) १०३ विद्यार्थीतर कल्याण कार्यक्रम, (११) राज्य युवा विकास निधी, (११) (०१)राज्य युवा विकास निधीला अनुदान (२२०४ ५६७१)

सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-४३१/व्यय-५, दिनांक २८.०५.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१२१९१६३४१८९५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2013.12.19 16:36:32 +05'30'

**( रा. चं. पाटील )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई,
४. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा व परिक्षा ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
७. नियोजन विभाग (का.१४७१ )मंत्रालय,मुंबई
८. वित्त विभाग ( व्यय-५),मंत्रालय,मुंबई

९. सर्व उपसंचालक,क्रीडा व युवकसेवा (संचालनालयमार्फत),
१०. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयमार्फत),
११. ग्रंथपाल,विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१२. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१३. मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१४. निवड नस्ती (क्रीयुसे-१,क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३)